MHBI120007472024

**नियमीत दिवाणी दावा क्र.१५५/२०२४ मधील नि.क्र.२३**
**खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.४ यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.४ ही कर्नाटक राज्यात राहत असून ती नोकरीस असून तिला सुट्टी न मिळाल्यामुळे ती मुदतीत आपला जबाबदावा दाखल करू शकलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ हिने जबाब दावा अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करून अर्जात नमूद केलेले कारण हे खोटे असल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.४ ही दिनांक २४.०२.२०२५ रोजी प्रस्तुत दाव्यात हजर झाली आहे. परंतु प्रकरणी मुदतीत जबाबदावा दाखल करू शकलेली नाही. अर्जात नमुद जबाबदावा दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण योग्य वाटते. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने सदर प्रतिवादी क्र.४ चा जबाबदावा अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. झालेल्या विलंबाबत प्रतिवादी क्र. ४ वर खर्च आकारणे योग्य आहे. तशी संधी न दिल्यास तिचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रू.३००/– खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम सदर प्रतिवादी क्र.४ ने वादीला पुढील तारखेपर्यंत अदा करावी.

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2026.01.07 17:20:20 +0530

स्थळ–धारुर
दिनांक–०७.०१.२०२६

(निलेश एम. वाली )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
धारुर

:: **Certificate of Stenographer** ::

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order/judgment. "

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur